# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

लक्ष्मीनगर झोन क्र. ०१

लक्ष्मीनगर, लक्ष्मीनगर पाण्याच्या टाकीजवळ, नागपूर – 440022

E-mail ID - laxminagarzoneno.1@gmail.com फोन क्र. 0712–2245833, 2245855


क्रमांक :– OW/744/AC/ I     दिनांक २८/०८/२०२५

प्रति,

Dr. Anil Sharma,
Project Co-ordinator,
Madhav Netralaya,
Eye Institute & Research Centre,
Nagpur.

विषय :- Application for grant of NO Objection Certificate for connection for excess treated water from Sewerage Treatment Plant to existing NMC sewer line for our proposed construction for Proposed Eye Institute & Research Centre on Kh. No. 7, CTS No. 6, Mouza- Jaitala, Hingana Road, Nagpur.

संदर्भ :- १) आपला अर्ज क्र. १३६७,दि . १३/०८/२०२४
२) या कार्यालयाचे पत्र क्र. OW/३८६/AC/Z-१,दि. १९/१२/२०२४.
३) आपला अर्ज क्र. ६१०, दिनांक २३.०७.२०२५.

उपरोक्त विषयान्यये संदर्भिय अर्जाच्या अनुषंगाने मौजा- जयताळा, न.भु.क्र. ६, खसरा क्र. ७ येथील प्रस्तावित माधव नेत्रालय, आय इंस्टिटयुट व रिसर्च सेंटर या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर तेथील मलवाहिनी नागपूर महानगरपालिकेतर्फे टाकलेल्या मालवाहिनीला जोडण्याकरीता खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून तात्पुरत्या स्वरुपात नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येते.

१. प्रस्तावित बांधकाम नकाशानुसार बांधकाम पूर्ण झाल्यानंतर भोगवाटा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर भोगवटा असणा-या प्रकल्पाच्या भागास आवश्यकतेनुसार मलजल जोडण्याकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करावा.

२. अर्जदाराने मलवाहिनी विकसीत करण्यापूर्वी म.न.पा.ला कळविणे बंधनकारक राहिल व म.न.पा.च्या सूचनेनुसार स्वखर्चाने मलवाहिनी विकसित करावी.

३. प्रस्तावित प्रकल्पाकरीता पर्यावरण विभागाद्वारे प्रस्तावित केल्यानुसार आवश्यक क्षमतेचा सांडपाणी शुध्दीकरण केंद्र (STP) बांधण्यात यावे.

४. प्रदुषण पातळी व प्रवाहमापन नुसार सांडपाणी शुध्दीकरण तंत्रज्ञान वापरण्यात यावे.

५. सांडपाणी शुध्दीकरण केंद्रातील प्रक्रीया केलेल्या पाण्याचा पुर्णः वापर करुन मुख्यते सदर पाणी गाळणी, फ्लशींग शौचालय इ. करीता वापरण्यात यावे. पुर्णः वापर झाल्यानंतर उर्वरीत प्रक्रीयायुक्त पाण्याकरीता स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

६. उर्वरीत प्रक्रीयायुक्त पाणी (Strom Drain Line) पावसाळी नालीमध्ये सोडले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

७. सांडपाणी शुध्दीकरण केंद्राबाबत आवश्यक आकडेवारीसह स्वतंत्र माहिती व त्याद्वारे प्रक्रीयायुक्त पुर्णः वापर पाण्याचा सविस्तर तपशिल म.न.पा.स देणे बंधनकारक राहिल.

८. पावसाळी पाणी जिरविण्याकरीता स्वतंत्र व्यवस्था करण्यात यावी.

९. मलवाहिनीतील पाणी पावसाळी पाण्यात मिसळणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०. सदर प्रस्तावित प्रकल्पाकरीता महाराष्ट्र प्रदुषन नियंत्रण मंडळ यांचेकडून Consent to operate letter व Environment Clearance (EC) इ. प्राप्त करण्याची जबाबदारी अर्जदाराची राहिल.

११. घनकचरा व्यवस्थापन कायदा 2016 मधील संबंधित सर्व तरतुदी बंधनकारक राहिल.

सदर पुन्हा "ना-हरकत" प्रमाणपत्र अर्जदाराच्या विनंती वरुन पर्यावरण प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याकरीता उपरोक्त अटी व शर्तीच्या अधिन राहुन देण्यात येत आहे.

सहा. आयुक्त
लक्ष्मीनगर झोन क्र. १,
म.न.पा., नागपूर.

E:\Sachin Shende 2023-24\New 2024/AC M. Letter